नि.दरखास्त क्र. ०३/२००५
मोरेश्वर गणपत देशमुख
वि.
दत्तात्रय हनुमंत देशमुख व इतर

## नि. १७६ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा अडथळादार श्रीमती तरुणा धनाजी देशमुख, श्रीमती कुसुम हनुमंत देशमुख, श्रीमती अल्का पंढरीनाथ देशमुख व श्रीमती कविता विलास देशमुख यांनी दि. प्र. सं. आदेश २१ नियम ९७ कलम ४७-ब व कलम १५१ अन्वये दाखल करून त्यांना पुरावा देण्याची संधी मिळावी व दरखास्तीच्या अंमलबजावणीस कायमस्वरूपी स्थगिती द्यावी याकरिता दाखल केलेला आहे.

२. अडथळादार यांच्या कथनानुसार प्रस्तुतची दरखास्त ही नि.दि.दावा नं. ३८/१९९८ च्या हुकूमनामानुसार दाखल असून त्यामध्ये तथाकथित भात गिरणीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अडथळा दूर करण्यासाठी दाखल आहे. सन २००५ मध्ये दरखास्त दाखल झाल्यानंतर पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ कोणतीही कार्यवाही झालेली नाही. दि. ०२/०५/२०१८ रोजी कोर्टाचे बेलीफ वाद जागेवर नि.५७ च्या नकाशासह गेले होते. त्याप्रमाणे त्यांनी पंचनामा व अहवाल दि. २९/०८/२००५ रोजी दाखल केला. त्याच्या आधारे नि.१६२ कडे दि. ०२/०९/२०२५ रोजी धनको यांनी ऋणको विरुद्ध कारवाई करण्याची विनंती केली. नि.१६१ चा पुरवणी पंचनामा आणि अहवालानुसार घर नंबर ८३ जेथे धनको यांची राईस मिल आहे ते घर गट नंबर ४७३ मध्ये असल्याचे धनको यांची स्पष्ट केस आहे. तथापि, नि.५७ ला असलेल्या नकाशामध्ये गट ४७३ किंवा घर नंबर ८३ चे अस्तित्व दिसत नाही. गट नंबर ४७३ मधील घर फार पूर्वीच पडले असल्याने धनको यांची भात गिरणी अस्तित्वात नाही. गट नंबर ४७३ च्या ७/१२ उता-यावर सार्वजनिक गुरांचा दांड असा उल्लेख आहे व त्यामध्ये जर अडथळा निर्माण झाला तर तो अडथळा दूर करण्याचे काम शासनाचे आहे. धनको यास त्याबाबत दावा दाखल करण्याचा अधिकार पोहोचत नाही.

३. अडथळादार यांच्या कथनानुसार अडथळादार नं. १ या धनाजी हनुमंत देशमुख यांची पत्नी आहे. त्यांचे लवले येथे घर क्र. २३८ स्थूल मानाने ६०९ चौ. फूट अशा मोजमापाचे तळमजला व माळा स्वरूपाचे वडिलोपार्जित घर सुमारे २०० वर्षांपासून अस्तित्वात आहे. धनाजी देशमुख यांनी तेथे त्यांच्या नावाने नवीन घर बांधले असून त्याचा ग्रामपंचायतीचा नमुना अनु. क्र. २७८ असा आहे. सदरचे घर गट क्र. ४७३ मध्ये नाही. तेथे पूर्व पश्चिम असा जाणारा रस्ता नाही. त्यामुळे ते घर कोणालाही अडथळा ठरू शकत नाही. अडथळादार क्र. १ या सदर घरामध्ये किरकोळ किराणा मालाचा वस्तू विक्रीचा व्यवसाय करतात जे त्यांचे एकमेव उपजीविकेचे साधन आहे. त्यांना निराधार आणि बेघर करण्याचा डाव रचून दरखासदार यांनी त्यांना पक्षकार केलेले नाही.

४. अडथळादार यांच्या कथनानुसार अडथळादार नं. २ या ९२ वर्षाच्या महिला असून त्यांचा घर नंबर २३६ आहे. ते १२ फुट X 20 फुट क्षेत्राचे कच्च्या विटांचे व सिमेंट पत्र्याचे छप्पर असलेले घर आहे. सदर घराच्या पाठीमागे राज्य विद्युत वितरणाचा खांब असून तो काढल्या खेरीज रस्ता मोकळा होणार नाही. सुमारे २० वर्षापासून अडथळादार नं. २ यांचे नाव त्या घराला नमूद आहे. ते घर गट नं. ४७३ किंवा गट नं. ४७४ मध्ये जाण्याच्या रस्त्यावर नाही. सदर अडथळादार या अतिवरिष्ठ नागरिक असून निराधार आहे. त्यांना कोणीही कैवारी नाही.

५. अडथळादार यांच्या कथनानुसार अडथळादार क्र. ३ या घर क्र. ६४ मध्ये राहत असून नमुना क्र. ८ च्या अनु.क्र.७७ ला त्यांचे घर आहे. सदर घराची घरपट्टी या नियमितपणे ग्रामपंचायतीला भरतात. सदरचे घर गट नं. ४७३ किंवा ४७४ कडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर नाही. अडथळाकार क्र. ४ या शेती करतात. त्यांना दि. १९/०२/१९९३ रोजी इंदिरा आवास योजनेतून लाभार्थी म्हणून घर मंजूर झाले असून त्या

घराला घर क्र. २१७ दिलेला आहे. ते फक्त पक्के आणि कौलारू घर आहे. अडथळाकार क्र. ४ यांचे पती ५ वर्षांपूर्वी मयत झाले असून त्या विधवा आणि निराधार आहे. नमूद घराशिवाय त्यांच्याकडे अन्य दुसरे कोणतेही घर नाही. अशा प्रकारे अडथळाकार यांची चारही घरे वर्षानु वर्षी अस्तित्वात असून तेथे ते कुटुंबियांसहित राहतात. त्या घरांचा कब्जा घेतल्यास अडथळाकार बेघर होऊन रस्त्यावर येतील.

६. अडथळादार यांच्या कथनानुसार धनको हे अडथळाकार यांचे भाऊबंध असून श्रीमंत व घमेंडखोर आहे. अडथळाकार त्यांची कोणतीही मालमत्ता रस्त्यात नाही. अडथळाकार यांनी विनम्रपणे बेलीफ यांना त्यांची भूमिका व परिस्थिती समजावून सांगितली. नि.५७ च्या नकाशातील तफावतीमुळे दरखास्तीची अंमलबजावणी करणे असंभव झाले आहे. दरखास्त मधील प्रत्यक्ष जागेच्या चतु:सीमा व नकाशा मेळ न बसणा-या आहेत. पंचनामा व अहवालानुसार अडथळादार यांची अचल मालमत्ता कायदेशीर स्वरूपात अनेक वर्षापासून असण्याचा स्पष्ट उल्लेख आहे त्यावरून अतिक्रमण सिद्ध होत नाही. दरखास्तीची अंमलबजावणी ही मुदतबाह्य झालेली आहे. त्यामुळे अडथळाकारांचा अर्ज मंजूर करून दरखास्तीच्या अंमलबजावणीस कायमस्वरूपी स्थगिती द्यावी व अडथळाकार यांना पुरावा देण्याची संधी द्यावी अशी विनंती अडथळाकार यांनी केली आहे.

७. नि.१७९ कडे दरखासदार यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्ज पूर्णपणे नाकारलेला आहे. त्यांच्या कथनानुसार अडथळाकार यांनी जाण्याच्या रस्त्यात अतिक्रमण करून दुकाने, घरे व संडासचा भाग बांधून अडथळा निर्माण केलेला आहे. तो दूर होण्याचा व मोकळा करण्याचा आदेश कोर्टाने दिलेला आहे. सदरचे सर्व अडथळे ऋणको यांच्या कुटुंबीयांच्या नावाने केलेले आहे. नि.१६१ कडील बेलीफ रिपोर्ट नुसार सुद्धा अडथळ्याची बाब नमूद केलेली आहे म्हणून धनको यांनी नि.१६२ कडे पोलीस संरक्षणात

अंमलबजावणी करण्याचा अर्ज दाखल केला आहे. अडथळाकार हे ऋणको यांचे सावत्र आई, भावजय व बहीण आहे. पूर्वी रस्त्यात असलेले अडथळे त्यांनीच केले असून त्यांनीच काढून टाकलेले आहेत व पुन्हा त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे अडथळे निर्माण केले आहे. त्यामुळे त्यांना या कामी पक्षकार करून घेण्याचा प्रश्न येत नाही. झालेला हुकूमनामा हा धनको ऋणकोसहित त्याच्या कुटुंबीयांवर ही बंधनकारक असल्याने तो हुकूमनामा व त्या सोबतचा नकाशा चुकीचा आहे असे दाखवण्याचा ऋणको यांना अधिकार नाही. हुकूमनाम्या विरुद्ध ऋणको यांच्याविरुद्ध अपील किंवा रिव्हीजन दाखल करण्याचा अधिकार नसल्यामुळे तो आजही त्यांच्यावर बंधनकारक आहे. हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ नये म्हणून ऋणको यांनीच अडथळाकार यांच्यामार्फत प्रस्तुतचा चुकीचा अर्ज दाखल केलेला आहे. गट नंबर ४७३ च्या पूर्वेला असलेला गावठाण जागेमध्ये धनको याचे घर क्र. ८३ होते व तेथे त्यांची राईस मिल होती. ती राईस मिल त्यांनी त्यांच्या मालकीच्या गट नं. ४७४ मध्ये म्हणजेच गुरांच्या दांडच्या पश्चिमेला तबदील केलेले आहे. त्यामुळे घर न.८३ चा भाग पडका व खुला दाखवण्यात आलेले आहे. परंतु मुख्यवाद विषय हा गावात जाणारा गुरांचा दांड व पूर्व पश्चिम रस्त्यामध्ये सामनेवाले यांनी निर्माण केलेले अडथळे असून ते मोकळे करण्यासंबंधीचा आहे. त्यामुळे अडथळाकार हे मूळ विषयापासून न्यायालयास दूर नेण्याचा प्रयत्न करीत आहे.

८.       द.दार यांच्या कथनानुसार अडथळाकार नं. १ चा पती धनाजी हा ऋणको याचा भाऊ आहे. <u>नि.१६१</u> च्या पंचनामांमध्ये तिने हरकत केल्याचे स्पष्ट नमूद आहे. त्या राहत्या घरावर दरखास्तदार यांची कोणतीही तक्रार नाही. अडथळादार क्र. १ यांचे कोणतेही अतिक्रमण वाद रस्त्यात नसल्यामुळे त्यांना दाव्यात पक्षकार केले नव्हते. अडथळाकार यांच्या पतीच्या नावे असलेल्या घर क्र. २३८ बाबतही धनको यांची तक्रार नाही. ऋणको व धनको यांच्यात झालेल्या तडजोडी वेळी सदरची टपरी काढून टाकण्यात आली होती. परंतु, पुन्हा त्याच जागेवर भर रस्त्यावर टपरी बांधण्यात आलेली आहे. त्यामुळे त्या टपरीला

ग्रामपंचायत घर क्रमांक न देता जी.पी.एस. असे लिहिलेले आहे. त्यामुळे ते वाद रस्त्यात आहे व त्याचा अडथळा होतो ही बाब स्पष्ट होते.

९. द.दार यांच्या कथनानुसार अडथळादार नं. २ ही ऋणको याची आई आहे. तिचे घर कोरोणा कालावधीमध्ये सन २०२० पासून तिच्याच नावे आहे. तिच्या घराचा भाग हा वाद रस्त्यावर आल्यामुळे रस्ता निमुळता झालेला आहे हे स्पष्ट दिसत आहे. तो निमुळता रस्ताच मूळ रस्त्या एवढा निमुळता करण्यासाठीच झालेले अतिक्रमण काढून टाकने आवश्यक आहे. त्या घराचा काही भाग रस्त्यात येत असल्यामुळे तो मोकळा करून काढून देणे आवश्यक आहे व त्याचा उल्लेख बेलीफ रिपोर्टमध्ये आहे. अडथळदार नं. २ यांनी वाद रस्त्यावर जाणून बुजून हेतू पुरस्तरपणे अडथळे निर्माण केले आहे. सर्व मंडळी ऋणको यांचे नातेवाईक असल्यामुळे त्यांच्यावर हुकूमनामा बंधनकारक असल्यामुळे केवळ कोर्टाची सहानुभूती मिळवण्याकरिता त्यांनी अशा प्रकारचे अर्ज दाखल केलेले आहे.

१०. दरखास्तदार यांच्या कथनानुसार अडथळादार ३ ही ऋणको यांची बहीण आहे. तिच्या घराचा वाद रस्त्यात कोणताही अडथळा नसल्यामुळे तिच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नाही व ऋणको यांची तक्रार नाही. अडथळादार नं. ४ ही ऋणको यांची मोठी भावजय आहे. तिच्या घरातील संडासचा बांधलेला भाग हा वाद रस्त्यामध्ये येतो तो अडथळयाचा भाग काढून बेलिफांना अंमलबजावणी करण्यास सांगितले होते व सर्व हरकतदार यांनी आरडाओरड केल्याने ती हरकत दूर करण्यात आलेली नाही. मूळ दाव्यामध्ये जे मूळ पक्षकार असतात त्यांना दरखास्तीमध्ये पक्षकार केले जाते. त्यामुळे हरकतदार यांना पक्षकार करण्याचा प्रश्न येत नाही. दि.प्र. संहिता आदेश २१ नियम ९७ प्रमाणे देखील अर्ज करण्याचा हरकतदार यांना हक्क नाही कारण ते सर्व ऋणकोचे कुटुंबीय आहेत व त्यांना दाव्याचे संपूर्ण स्वरूप माहिती आहे. प्रस्तुत हरकतदार यांनी त्यांच्या

भाऊबंदकीचा हिस्सा वाटप झाल्यानंतर स्वतः चा शेती व्यवसाय सुरू केला व मुलांना योग्य शिक्षण देऊन त्यांनी काम धंद्यास लावले व स्वतःची आर्थिक परिस्थिती चांगली केली. त्याचा हेवा व तिरस्कार वाटून तो धनको यांची भरभराट थांबवण्याकरिता हरकतदार यांनी अशा प्रकारचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी यांनी केलेली आहे.

११. द. दार व ऋणको यांच्या वकीलांना ऐकले व त्यांनी सादर केलेला लेखी युक्तिवाद वाचला. अर्ज व म्हणणेतील कथनांना अनुसरुन खालील मुद्दे या न्यायालयाच्या विचाराधीन असून त्याचे निष्कर्श कारणांसहीत नोंदवलेले आहेत.

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्श** |
|---|---|---|
| १. | हरकतदार यांची हरकत दि.प्र.सं.आ.२१ नियम ९७ व कलम ४७ ब अंतर्गत येते काय ? | नकारार्थी... |
| २. | प्रस्तुतच्या दरखास्तीची अंमलबजावणी स्थगित करता येईल काय ? | नकारार्थी... |
| ३. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करणेत आला. |

## कारणमीमांसा

१२. दि. प्र.सं. कलम ४७ अंतर्गत मूळ वादातील पक्षकार किंवा मूळ पक्षकाराचा मृत्यू झाला असल्यास त्याचे कायदेशीर वारस किंवा ज्याने कायदेशीररित्या पक्षकाराचे हक्क प्राप्त केले आहेत अशी व्यक्ती अर्ज दाखल करु शकते. आदेश २१ नियम ९७ अंतर्गत ज्याच्या बाजूने न्यायालयाने निकाल दिला आहे अशी हुकूमनामा धारक व्यक्ती, लिलाव खरेदीदार ज्याने न्यायालयाच्या लिलावात ती मालमत्ता विकत घेतली आहे आणि ताबा मिळवताना त्याला अडथळा येत आहे, व न्यायालयीन निर्णयानुसार आणि कायद्याच्या

व्याप्तीनुसार, ज्या त्रयस्थ व्यक्तीचा त्या मालमत्तेत स्वतंत्र हक्क किंवा हितसंबंध आहे आणि ज्याला बेकायदेशीरपणे बाहेर काढले जाण्याची भीती आहे, ती व्यक्ती देखील अडथळा नोंदवण्यासाठी किंवा आपले हक्क शाबीत करण्यासाठी अर्ज करू शकते. थोडक्यात, जर ताबा मिळवताना अडथळा निर्माण झाला असेल, तर हुकूमनामा धारक नियम ९७ नुसार तक्रार करतो. जर हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील त्रुटींवर आक्षेप घ्यायचा असेल, तर मूळ पक्षकार किंवा त्यांचे वारस कलम ४७ चा आधार घेतात.

१३. अर्जदार हे मूळ दावा ३८/१९९८ चे पक्षकार नाहीत आणि त्यांचे प्रतिनिधित्वही करत नाहीत, त्यामुळे कलम ४७ मधील अटींची पूर्तता होत नाही. त्रयस्थ व्यक्तींनी आपला स्वतंत्र हक्क स्वतंत्र दाव्याद्वारे किंवा ताबा गेल्यानंतर आदेश २१ नियम ९९ नुसार सिद्ध करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदार यांना अंमलबजावणी प्रक्रियेत थेट हरकत घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. तसेच कलम १५१ चा वापर अशा ठिकाणी करता येत नाही जिथे विशिष्ट कायदेशीर तरतूद उपलब्ध आहेत. या कारणास्तव अर्जदार यांचा अर्ज कलम १५१ व कलम ४७ च्या कार्यकक्षेत बसत नाही.

१४. दि. प्र. संहिताच्या आदेश २१ नियम ९७ अंतर्गत कोणत्याही अशा व्यक्तीच्या ताब्याचे संरक्षण केले जाते, जिचा ताबा कायदेशीर आहे आणि जी हुकूमनाम्याला बांधील नाही. जर एखादी व्यक्ती त्या मालमत्तेत स्वतः चा स्वतंत्र हक्क सांगत असेल उदा.ती व्यक्ती मूळ दाव्यातील प्रतिवादीची वारस नाही किंवा तिच्याकडे स्वतंत्र खरेदीखत आहे, तर तिचा ताबा कायद्याने सुरक्षित केला जाऊ शकतो.जर एखादी व्यक्ती कायदेशीर भाडेकरू म्हणून तिथे राहत असेल आणि हुकूमनामा केवळ घरमालकाच्या विरोधात असेल, तर त्या भाडेकरूला 'योग्य कायदेशीर प्रक्रिया पाळल्याशिवाय बाहेर काढता येत नाही. जर एखाद्या व्यक्तीने दाव्याच्या निकालापूर्वी कायदेशीररित्या ताबा

मिळवला असेल आणि ती व्यक्ती दाव्यातील पक्षकार नसेल, तर तिचा ताबा संरक्षित होऊ शकतो. ज्या व्यक्तीचा हुकूमनामा ज्याच्या विरुद्ध झाला आहे त्याच्याशी कोणताही संबंध नाही, अशा व्यक्तीच्या ताब्याचे संरक्षण या कलमांतर्गत चौकशी होईपर्यंत केले जाते.

१५. प्रस्तुत अर्जातील हरकतदार क्र. १ ते ३ या मूळ दाव्यातील ऋणको यांचे जवळचे नातेवाईक/कुटुंबीय आहेत. त्यांनी आपल्या अर्जात नमूद केलेली घरे आणि जागा या मूळ हुकूमनाम्यातील 'लाल रंगाने' दर्शवलेल्या अतिक्रमणित क्षेत्राचा भाग आहेत. नि.१६१ वरील बेलिफ रिपोर्टचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना हरकतदारांनी जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला व शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला. अडथळादारांचा दावा आहे की त्यांची घरे जुनी आहेत, परंतु मूळ दावा क्र. ३८/१९९८ हा अतिक्रमणाबाबत होता आणि न्यायालयाने पुराव्याअंती ते अतिक्रमण असल्याचे मान्य करून हुकूमनामा दिला आहे. अंमलबजावणी न्यायालय मूळ हुकूमनाम्याच्या मागे जाऊन पुन्हा गुणवत्तेवर विचार करू शकत नाही. अडथळादार हे ऋणकोंचे वारस/कुटुंबीय असल्याने त्यांच्यावर हुकूमनामा बंधनकारक आहे. कलम ४७ अंतर्गत त्यांना 'स्वतंत्र त्रयस्थ व्यक्ती' म्हणून कोणतेही संरक्षण मिळण्यास ते पात्र नाहीत. सदर अर्ज हा केवळ दरखास्त लांबणीवर टाकण्याच्या हेतूने दाखल केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

१६. मुळ दावा क्र.३८/१९९८ हा दि.२६/३/१९९९ ला निकाली झाला. त्यावर ऋणको यांनी अपील दाखल केले नाही. त्यानंतर द.दार यांनी रे.दं.नं.२/२००० ची दरखास्त दाखल केली. ज्यामध्ये आपसात होवून ऋणको यांनी अतिक्रमण काढून घेतलेची बाब अभिलेखावर आहे. परंतु, पुन्हा अतिक्रमण केले म्हणून द.दार यांनी रे.द.नं.३/२००५ ची दरखास्त दाखल केली. यामध्ये नि.१६१ कडे ऋणकोचे कुटंबिय म्हणजेच अर्जातील

अडथळादार यांनी अतिक्रमण केलेचा अहवाल प्राप्त झाला. हरकतदार यांनी त्यांचे दावा रस्त्यातील बांधकामाची वहीवाट २०० वर्षापासूनची आहे असे सांगितले. परंतू, ऋणको यांनी जी कागदपत्रे दाखल केली ती २०० वर्षाची वहीवाट सांगण्यास अपुरी आहेत. सन २००० मध्ये आपसातीनंतर अतिक्रमण काढले गेले याबाबत द.दार व जे.डी यांचे दुमत नाही. त्यावरुन निश्चतीतच नि.१६१ च्या अहवालात दाखवले गेलेले अतिक्रमण हे आपसातीनंतर केलेले व हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस अडथळा करण्यासाठी केले गेले असेच चित्र याठिकाणी दिसते.

१७. अशाप्रकारे दि.प्र.सं. आ. २१ नियम १०२ नुसार, अडथळादार हे ऋणकोचे प्रतिनिधी/कुटुंबीय असल्याचे सिद्ध होत असल्याने त्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण देणे योग्य होणार नाही. हरकतदारांनी स्वतः कबूल केले आहे की त्या ऋणकोचे कुटुंबातील सदस्य आहेत. कायद्याच्या प्रस्थापित तत्त्वानुसार, ऋणकोचे नातेवाईक किंवा त्याच्या वतीने ताबा धरून ठेवणाऱ्या व्यक्ती या 'स्वतंत्र त्रयस्थ व्यक्ती' ठरू शकत नाहीत. त्यांच्यावर मूळ हुकूमनामा ऋणकोप्रमाणेच बंधनकारक आहे.

१८. ही सर्व परीस्थीती माहीत असतानाही केवळ अंमलबजावणीचे काम लांबणीवर पडावे या हेतूने अडथळादार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिल्याचे दिसून येते. इतकेच नाही तर या अर्जास मुळ ऋणको यांनी कोणतेच म्हणणे दाखल केले नाही. मुळ ऋणको यांच्या वकीलांमार्फतच अडथळादार यांनी अर्ज केला असल्याने मुळ ऋणको हे प्रत्यक्षपणे अडथळादार यांना पुढे करुन अमंलबजावणीचे काम जाणुनबुजून तहकुब करण्याचा प्रयत्न करित आहेत असे ही स्पष्ट झाले असल्याने अर्ज रक्कम रु. १०००/-च्या खर्चावर नामंजूर करणे योग्य होईल. त्यामुळे या सर्व कारणावर मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकाराथी नोंदवून मुद्दा क्र. ३ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

नि.दरखास्त क्र. ०३/२००५
मोरेश्वर गणपत देशमुख
वि.
दत्तात्रय हनुमंत देशमुख व इतर

## :- आदेश -:

| | |
|---|---|
| १. | अर्ज खालील प्रमाणे रक्कम रुपये १०००/- च्या खर्चावर नामंजुर करण्यात आला. |
| २. | अडथळादार श्रीमती तरुणा धनाजी देशमुख, श्रीमती कुसुम हनुमंत देशमुख, श्रीमती अल्का पंढरीनाथ देशमुख व श्रीमती कविता विलास देशमुख यांनी सदरचा खर्च द.दार यांना दयायचा आहे. |
| ३. | वरीलप्रमाणे अडथळादार यांनी खर्चाची रक्कम द.दार यांना न दिल्यास ऋणको यांनी अडथळादार यांचे नातेवाईक या नात्याने द.दार यांना देणेचा आहे. |

URMILA PARASHRAM KOLI
Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2026.05.05 18:41:30 +0530

दि. ०५.०५.२०२६

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर

**प्रमाणपत्र**

आदेशाची तारीख :- ०५/०५/२०२६
तपासण्याची तारीख :- ०५/०५/२०२६
सही केलेली तारीख :- ०५/०५/२०२६
अपलोड केल्याची तारीख :- ०५/०५/२०२६

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शहापूर
दिनांक-०५/०५/२०२६
स्थळ - शहापूर

(लघुलेखिका नि.श्रे.)
एस.एस. काकडे